तारेचा पत्ता : " कोंकणप्राप्ती " दापोली
दूरध्वनी S.T.D. : (०२३५८) कार्यालय निवास
कुलगुरु : २८२०६४ २८०४७७
कुलसचिव : २८२०६५ २८२०६६
विद्यापीठ कार्यालय : २८२०२६ २८२४११ ते २८२४१३
फॅक्स : (०२३५८) २८२०७४ / २८२४१७ / २८४३०८

डॉ. सी. व्ही. भावे,
कुलसचिव

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

दापोली ४१५ ७१२, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)

डाक नोंद पोहोच देय

28 AUG 2008

जा.क्र.डॉबासाकोकृवि/शिक्षण-अ/4933/०८.

प्रति,

अध्यक्ष,
ब्राम्हणेश्वर शैक्षणिक सामाजिक उन्नती मंडळ, मठखुर्द
स्मृतीसदन, घर नं. ४५१, मठखुर्द
पो. वाघेरी, ता. कणकवली,
जि. सिंधुदुर्ग. (पीन ४१६६०१)

विषय : विना अनुदानित तत्वावर कृषि व संलग्न पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तात्पुरत्या स्वरुपात तत्वत: मान्यता देणेबाबत ...

संदर्भ : आपण जा.क्र. १२१/०७, दिनांक ०८.०८.०७ अन्वये सादर केलेला अर्ज.

महोदय

शासन निर्णयानुसार महाराष्ट्र कृषि विद्यापीठे अधिनियम १९८३ कलम ३१ (११) मधील तरतुदीनुसार डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने दिनांक २२ फेब्रुवारी, २००८ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्रमांक २०२/१८ अन्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून मौजे फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे 'कृषि महाविद्यालयामार्फत' चार वर्षे मुदतीचा पदवी अभ्यासक्रम (बी.एस्सी. (कृषि)) ६० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास तात्पुरत्या स्वरुपात तत्वत: मान्यता दिली आहे.

सदर मान्यता शासन निर्णय क्रमांक कृषिवि/२१९०/सीआर-२०३/२०-अे, दिनांक ८ जुलै १९९९, शासन निर्णय क्रमांक कृषिवि/२१९०/सीआर-२०३/२०-अे, दिनांक १ जुलै २०००, व शासन निर्णय क्रमांक कृषिवि/२००३/प्र.क्र. १४५/२०-अे, दिनांक ८ ऑगस्ट, २००३ आणि कृषि परिषदेने विहीत केलेली मार्गदर्शक तत्वे व निकष यांना अधीन राहून व त्यामधील निकषांची आपल्या संस्थेकडून पूर्तता करण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.

मान्यतेनुसार आपल्या पदवी अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी सोबत जोडलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. या बाबींची पूर्तता न केल्यास मान्यता पुढे चालू ठेवण्याची प्रक्रिया स्थगित अथवा रद्द करण्याचे हक्क कार्यकारी परिषद राखून ठेवीत आहे.

....२

सोबत खालील प्रमाणे कागदपत्रे पूर्ततेकरिता जोडण्यात येत आहेत.

१. अटी व शर्ती            २. बँक गॅरंटी नमुना

३. शासन निर्णय (३)       ४. अभ्यासक्रम

५. शैक्षणिक विनियम       ६. परिनियम १९९० मधील तरतूद क्र. १३३ ते २४६

आपला विश्वासू

कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित

१. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
२. शिक्षण संचालक,डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
३. नियंत्रक, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ,दापोली
   २/— संबंधित संस्थेमार्फत लेखा विषयक बाबींची पूर्तता करण्यात येते किंवा नाही [illegible]
   आपल्या शाखेमार्फत वेळोवेळी करण्यात यावा
४. उपकुलसचिव, डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ,दापोली